## प्रेसनोट

जा.क्र. २३४ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस उप अधिक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक :— ४/०५/२०१८

**" जुन्या वादावरून चुलत भावास जिवे ठार मारणाऱ्या आरोपीस आजीवन सश्रम कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा"**

पोलीस ठाणे लाखनी अंतर्गत तलाव वार्ड लाखनी येथिल आरोपी नामे चैतराम सिताराम पचारे, वय ३२ वर्ष, रा. तलाव वार्ड लाखनी ता.लाखनी, जिल्हा भंडारा याने चुलत भाउ मोहन चंभरू पचारे याचे डोक्यावर लाखडी काठीने मारुन खुन केल्याचा आरोप सिध्द झाल्याने आज दिनांक ४.०५.२०१८ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा चे अतिरीक्त सत्र न्यायाधिश वर्ग १ श्री. आर. पी. पांडे सा. यांनी आरोपीस आजन्म सश्रम कारावास व ५०००/— रूपये द्रव्यंडाची शिक्षा सुनावली.

याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक २३.०६.२०१६ ला तक्रारदार श्रीमती यशोदा चंभरू पचारे, वय ६० वर्ष रा. तलाव वार्ड लाखनी यांनी पोलीस ठाणे लाखनी येथे येवुन तोंडी तक्रार दिली की, सकाळी १०.०० वा. दरम्यान भाउ मोहन, वहिनी सौ. शालु व आई श्रीमती चंद्रभागा पचारे असे सर्व लोकांनी जेवन करून भाउ मोहन हा गावचे चौकाकडे खर्रा घेण्याकरीता निघाला असता, चुलत भाउ आरोपी नामे चैतराम सिताराम पचारे हा मोहन पचारे याचे पत्नीवर वाईट नजर ठेवत असल्याचे व दारू पिवुन झगडा भांडण करीत असल्याचे कारणावरून ६ महिण्यापुर्वी वाद झाले होते त्याच वादाचा राग मनात ठेवुन मोहन पचारे यास जिवानिशी ठार मारण्याचे उद्देशाने हाता मध्ये बासाचे काठीचा दंडा घेवुन आला व भाउ मोहन चंभरू पचारे याला त्या काठीने डोक्याचे मागील बाजुस, डावे पायाचे टोंगऱ्याजवळ व कमरेजवळ मारल्याने तो खाली पडला त्यावरून घरा शेजारी लोकांना आवाज दिल्याने शेजारी राहणारे आले मोहन पचारे बेहोश असल्याने त्यास औषधोपचार करीता लाखनी येथिल डॉ. धांडे यांचे दवाखान्यात नेले त्यानंतर लक्ष हॉस्पीटल, भंडारा येथे औषधोपचारा करीता नेण्यात आले. आरोपी चैतराम सिताराम पचारे याचेवर कार्यवाही होण्याकरीता तक्रार दिली. सदर तक्रारी वरुन पो.स्टे लाखनी येथे अप.क्र. ८९/१६ कलम ३०७ भा.द.वि. अन्वये सहा.पोलीस निरीक्षक कमलेश सोनटक्के यांनी नोंद केला.

सदर गुन्हयाचा प्राथमिक तपास पोलीस उपनिरीक्षक दिपक वानखेडे यांनी तपास सुरू आरोपीस अटक केली व पुरावे गोळा केले तपासा दरम्यान दिनांक ४.०७.२०१६ रोजी जख्मी मोहन चंभरू पचारे याचा उपचारा दरम्यान लक्ष हॉस्पीटल भंडारा येथे मृत्यु झाला. प्राप्त माहितीवरून गुन्हयात मृतकाचे शवविच्छेदन करून कलम ३०२ भादवि ची वाढ केली. सदर गुन्हयाचा उर्वरीत तपास पोलीस उप निरीक्षक अनिल कुमरे यांनी करून आरोपी विरुध्द योग्य व सबळ पुरावे मिळुन आल्याने खुन व खुनाचा प्रयत्न करणे या आरोपा खाली दोषारोप पत्र जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा येथे दाखल केले. सदर आरोपपत्रास केस क्र. ५३/१६ अन्वये अतिरीक्त सत्र न्यायाधिश श्री. आर. पी. पांडे सा. यांचे समक्ष सुनावणी करीता ठेवण्यात आले.

सदर गुन्हयाची सुनावणी अतिरीक्त **सत्र न्यायाधिश श्री. आर. पी. पांडे सा.** यांचे न्यायालयात चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट श्री. विनोद बी भोले, जिल्हा सरकारी अभियोक्ता**, सत्र न्यायालय भंडारा यांनी योग्य बाजु मांडुन एकुन १० साक्षदार तपासले. आज दिनांक ४.०५.२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरूप व गंभिरता लक्षात घेवुन **आरोपी नामे** चैतराम सिताराम पचारे, वय ३२ वर्ष, रा. तलाव वार्ड लाखनी जिल्हा भंडारा यांचे विरूध्द दोषसिध्द झाल्याने **कलम ३०२ भादवि अन्वये आजन्म सश्रम कारावास व ५०००/— रूपये दंड, अशी शिक्षा सुनावण्यात आली.** सदर गुन्हयात पोलीस निरीक्षक, यशवंत सोलसे, ठाणेदार पोलीस ठाणे लाखनी यांचे मार्गदर्शनात पोलीस हवालदार, सुनिल राउत, ब.न.६३६ यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

**महाराष्ट्र पोलीस दल, जिल्हा भंडारा तसेच सरकारी अभियोक्ता वर्ग जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा तर्फे जनतेस निर्भीड पणे गुन्हयाचे दोषसिध्दी करीता व महिलांवरील अत्याचार रोखण्याकरीता पोलीसांना पंच व साक्षदार म्हणुन सहकार्य करण्याचे जाहिर आवाहन करण्यात येत आहे.**

(एस. बी. ताजणे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)
दुरध्वनी क्र.०९५४५९९७०२५

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत:** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.